कामगार आयुक्त, मुंबई यांच्या आस्थापनेवरील सरकारी कामगार अधिकारी गट-ब या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नियतकालिक बदल्या.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन आदेश क्र.बदली-०६२४/प्र.क्र.१०७/कामगार-८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ३० ऑगस्ट, २०२४.

**वाचा:-** १. "महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५"
२. सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ६ दि.२९.०८.२०२४.

**शासन आदेश:-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (४क) मधील तरतूदीनुसार खाली नमूद केलेल्या कामगार आयुक्त, मुंबई यांच्या आस्थापनेवरील सरकारी कामगार अधिकारी, गट-ब या संवर्गातील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदावर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने बदलीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | सध्याचे कार्यरत ठिकाण | नागरी सेवा मंडळाची शिफारस | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. स्व. स. गुरव | मुंबई शहर (जी साऊथ वार्ड) | मुंबई उपनगर (पूर्व) (एन वॉर्ड) | रिक्त पदी |
| २ | श्रीम. वंदना र. कोळपे | मुंबई (ग्रामीण विभाग-१२ व बाल कामगार कक्ष) | मुंबई औद्योगिक संबंध शाखा कार्या-९ | रिक्त पदी |
| ३ | श्रीम. सु. प्र. दळवी | मुंबई (प्रशासन-३) | विकास आयुक्त (अ.सं.), मुंबई | श्रीम. भोर यांच्या बदलीने रिक्त झालेल्या पदावर |
| ४ | श्री. अ. म. सावरकर | मुंबई शहर ए. बी. वॉर्ड | मुंबई शहर (जी साऊथ वॉर्ड) | श्रीम. गुरव यांच्या बदलीने रिक्त झालेल्या पदावर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | श्रीम. र. सु. भोर | विकास आयुक्त (अ.सं.), मुंबई | कल्याण | रिक्त पदी |
| ६ | श्री. अ. बं. वडे | मुंबई | मुंबई उपनगर (पश्चिम) आर वॉर्ड | रिक्त पदी |
| ७ | श्रीम. अ.सु. वाघ | सातारा | पुणे | रिक्त पदी |
| ८ | श्री. दीपक गं. गोटके | पालघर (अवघड क्षेत्र) | पुणे (खेड तालुक्यातील चाकण एम.आय.डी.सी.-क्षेत्र फेज १ व ३ कार्यक्षेत्र) | रिक्त पदी |
| ९ | श्री. तु. ग. बोरसे | अहमदनगर | नाशिक (अंबड, एम.आय.डी.सी. नाशिक कार्यक्षेत्र) | रिक्त पदी |
| १० | श्री. वि. नं. माणगांवकर | परभणी | सचिव, किराणा व दुकाने बाजार मंडळ, मुंबई | रिक्त पदी |

२. सदरील आदेश तात्काळ अंमलात येत असून उपरोक्त नमूद अधिकाऱ्यांना बदलीने पदस्थापना दर्शविण्यात आलेल्या पदावर तात्काळ रुजू होण्यासाठी ते धारण करत असलेल्या पदावरुन या आदेशान्वये कार्यमुक्त करण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी आदेशाच्या दिनांकापासून विहित कालावधीत रुजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा **अनुपस्थितीचा कालावधी हा "अकार्यदिन"** (dies non) **म्हणून गणला जाईल.** तसेच, संबंधितांविरुद्ध शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१८६/१६/कार्यासन-१४,दि.२३.१२.२०१६ मधील तरतूदींनुसार **शिस्तभंगविषयक कारवाई** करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. वरील अधिकाऱ्यांना नियमानुसार अनुज्ञेय असणारा पदग्रहण अवधी, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देय राहील.

५. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करु नये. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

६. उपरोक्त अधिकाऱ्यांनी पदभार स्विकारल्याचा अहवाल कामगार आयुक्त यांनी तातडीने शासनास सादर करावा.

७. सदरहू आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

८. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०८३०१७३५५६१५१० असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=3389518a88af500ef17fd52858804c56d5b0db93ce68c9638764849614f0c8b3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2BC41DDF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
Date: 2024.08.30 20:24:25 +05'30'

**(स्वप्निल कापडणीस)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

कामगार आयुक्त, कामगार भवन, ब्लॉक-ई, सी-२०, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई.

**प्रत,**

१. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. कामगार उप आयुक्त (प्रशासन) कामगार भवन, ब्लॉक-ई, सी-२०, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
४. सर्व संबंधित अधिकारी (कामगार आयुक्त यांचेमार्फत)
५. महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुदेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
६. संबंधित सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
७. उप सचिव (कामगार-८) यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८. निवडनस्ती (कामगार-८), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय.